**L. A. BILL No. CVI OF 2025.**

*A BILL*

TO AMEND THE MAHARASHTRA LOKAYUKTA ACT, 2023.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०६.**

**महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ यामध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

२०२५ चा महा. ४६.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ यामध्ये सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहेः-

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र लोक आयुक्त (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम १ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १ मधील, पोट-कलम (३) ऐवजी, पुढील पोट-कलम ८ डिसेंबर २०२५ पासून दाखल करण्यात येईल :– २०२५ चा महा. ४६.

"(३) (एक) कलमे १, ३ व ४ ही, हा अधिनियम **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकास अंमलात येतील.

(दोन) उर्वरित कलमे, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येतील आणि या अधिनियमाच्या वेगवेगळ्या तरतुदींसाठी, वेगवेगळे दिनांक नियत करता येतील.".

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम २ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २ मध्ये, पोट-कलम (१) मधील,—

(१) उप-खंड (च) मधील, परिच्छेद (आठ) नंतर, पुढील स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात येईलः–

"**स्पष्टीकरण.–** या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, संसदेच्या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या किंवा घटित केलेल्या कोणत्याही निकायाचा किंवा मंडळाचा किंवा महामंडळाचा किंवा प्राधिकरणाचा किंवा कंपनीचा किंवा सोसायटीचा किंवा स्वायत्त संस्थेचा (मग तिला कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो) अध्यक्ष किंवा सदस्य अथवा अधिकारी याचा अर्थ, संसदेच्या अधिनियमान्वये राज्य शासनाने नियुक्त केलेला केवळ असा अध्यक्ष, सदस्य किंवा व्यक्ती, असा आहे.";

(२) उप-खंड (ञ) मधील, "फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम २ च्या खंड (ज) अन्वये" या मजकुराऐवजी, "भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ याच्या कलम २ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ठ) अन्वये" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९७४ चा २. २०२३ चा ४६.

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम १२ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १२ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (छ) नंतर, पुढील स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात येईल :–

"**स्पष्टीकरण.–** या खंडाच्या प्रयोजनांसाठी, संसदेच्या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या कोणत्याही निकायाचे किंवा मंडळाचे किंवा महामंडळाचे किंवा प्राधिकरणाचे किंवा कंपनीचे किंवा सोसायटीचे किंवा विश्वस्त संस्थेचे किंवा स्वायत्त संस्थेचे (मग तिला कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो) अधिकारी व कर्मचारी याचा अर्थ, संसदेच्या अधिनियमान्वये राज्य शासनाद्वारे किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही प्राधिकरणाद्वारे नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचारी, असा आहे;".

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम २४ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम २४ मध्ये,–

(१) पोट-कलम (३) मधील, "फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम १७३" या मजकुराऐवजी, "भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ याच्या कलम १९३" हा मजकूर दाखल करण्यात येईल; १९७४ चा २. २०२३ चा ४६.

(२) पोट-कलम (४) मधील, "फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम १७३" या मजकुराऐवजी, "भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ याच्या कलम १९३" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९७४ चा २. २०२३ चा ४६.

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम २७ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम २७ मध्ये,–

(१) पोट-कलम (१) मधील, "भारतीय पुरावा अधिनियम, १८७२" या मजकुराऐवजी, "भारतीय साक्षी अधिनियम, २०२३" हा मजकूर दाखल करण्यात येईल; १८७२ चा १. २०२३ चा ४७.

१८६० चा ४५. २०२३ चा ४५.

(२) पोट-कलम (२) मधील, खंड (ख) मधील, "भारतीय दंड संहितेखालील" या मजकुराऐवजी, "भारतीय न्याय संहिता, २०२३ खालील" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१९७४ चा २. २०२३ चा ४६.

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३० ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३० मध्ये, पोट-कलम (२) मधील, "फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम १९७" या मजकुराऐवजी, "भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ याच्या कलम २१८" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१८६० चा ४५. २०२३ चा ४५.

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३५ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३५ मध्ये, पोट-कलम (२) मधील, "भारतीय दंड संहितेच्या कलम १९३" या मजकुराऐवजी, "भारतीय न्याय संहिता, २०२३ याच्या कलम २२९" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१९७४ चा २. २०२३ चा ४६.

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ५० ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५० मध्ये, पोट-कलम (३) मधील, "फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम १९९ ची पोट-कलमे (२) ते (५)" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "अपराधांच्या संबंधात लागू होतील" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईलः-

"भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ याच्या कलम २२२ ची पोट-कलमे (२) ते (५) च्या तरतुदी, त्या ज्याप्रमाणे उक्त कलम २२२ च्या पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अपराधांच्या संबंधात लागू होतात त्याचप्रमाणे त्या पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) खालील अपराधांच्या संबंधात लागू होतील".

१८६० चा ४५. २०२३ चा ४५.

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ५६ ची सुधारणा.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५६ मधील, "भारतीय दंड संहितेच्या कलम २१" या मजकुराऐवजी, "भारतीय न्याय संहिता, २०२३ याच्या कलम २ च्या खंड (२८)" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१८६० चा ४५. २०२३ चा ४५.

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ६५ ची सुधारणा.

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६५ मध्ये, खंड (क) मधील, "भारतीय दंड संहितेच्या कलम १९" या मजकुराऐवजी, "भारतीय न्याय संहिता, २०२३ याच्या कलम २ च्या खंड (१६)" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

विवक्षित प्रकरणांमध्ये, महाराष्ट्र शासनाने अथवा महाराष्ट्र राज्यातील विवक्षित सार्वजनिक प्राधिकरणांनी किंवा त्यांच्या वतीने केलेल्या प्रशासकीय कारवायांची चौकशी करण्यासाठी आणि त्यांच्या विरुद्धच्या भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी व अन्वेषण करण्याकरिता लोक आयुक्त संस्थेची स्थापना करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ (२०२५ चा महा. ४६) अधिनियमित केला आहे. उक्त अधिनियमाच्या कलम १२ मध्ये, जे लोक आयुक्ताच्या अधिकारितेत येतात असे विविध प्राधिकारी, अधिकारी व कर्मचारी निर्दिष्ट केलेले आहेत.

**२.** संसदेच्या विविध अधिनियमांच्या तरतुदींनुसार, केंद्र सरकारद्वारे तसेच राज्य शासनांद्वारे विविध मंडळे, प्राधिकरणे, समित्या, इत्यादी घटित केलेल्या आहेत किंवा नेमलेल्या आहेत. उक्त अधिनियमाच्या कलम १२ च्या पोट-कलम (१) च्या खंड (छ) अन्वये, जी प्राधिकरणे किंवा अधिकारी संसदेच्या अधिनियमान्वये राज्य शासनाने घटित केलेली आहेत किंवा नेमलेली आहेत आणि ज्यांना, संपूर्ण राज्याची किंवा राज्याच्या भागाची अधिकारिता आहे केवळ अशाच प्राधिकरणांचा किंवा अधिकाऱ्यांचा, लोक आयुक्ताच्या अधिकारितेत समावेश करण्याचे उद्देशित आहे, आणि जी प्राधिकरणे किंवा अधिकारी, संसदेच्या अधिनियमान्वये केंद्र सरकारने घटित केलेली आहेत किंवा नेमलेली आहेत आणि जी लोकपाल व लोक आयुक्त अधिनियम, २०१३ (२०१४ चा १) याच्या अधिकारकक्षेत येतात अशा प्राधिकरणांचा किंवा अधिकाऱ्यांचा समावेश करण्याचे उद्देशित नाही.

केंद्रीय अधिनियमान्वये नियुक्त केलेल्या अशा प्राधिकरणांच्या बाबतीतील, लोकपाल आणि लोक आयुक्त अधिनियम, २०१३ अन्वये नियुक्त केलेल्या लोकपालाच्या आणि उक्त अधिनियमाखालील लोक आयुक्ताच्या अधिकारितेच्या परस्परव्याप्ततेसंबंधीची शंका दूर करण्याच्या दृष्टीने, आणि या संबंधातील भारत सरकारच्या गृह मंत्रालयाचा पत्रव्यवहार विचारात घेता, उक्त अधिनियमाच्या तरतुदींमध्ये स्पष्टता आणणे इष्ट आहे, असे वाटते. म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम २ मध्ये आणि कलम १२ च्या पोट-कलम (१) च्या खंड (छ) मध्ये, सुयोग्य सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

तसेच, उक्त अधिनियमाखालील लोक आयुक्ताच्या सदस्यांची निवड करण्याच्या दृष्टीने, उक्त अधिनियमाची निवड समितीशी संबंधित असणारी कलमे तात्काळ प्रभावाने अंमलात आणणे आवश्यक आहे. उक्त अधिनियमाच्या प्रारंभाच्या कलमात सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे, असे वाटते.

**३.** महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियमामधील निरसित केलेल्या केंद्रीय अधिनियमांच्या संदर्भाऐवजी विद्यमान केंद्रिय अधिनियमांचे संदर्भ बदली दाखल करण्यासाठी परिणामस्वरूप सुधारणा करण्याची संधी देखील घेतली आहे.

**४.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

नागपूर,
दिनांक १० डिसेंबर २०२५.

**देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेः-

**खंड २.**— महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ याच्या कलम १ च्या पोट-कलम (३) ऐवजी दाखल करण्याचे प्रस्तावित असणाऱ्या या खंडान्वये, या अधिनियमाची उर्वरित कलमे, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास अंमलात आणण्याचा आणि या अधिनियमाच्या विविध तरतुदींसाठी वेगवेगळे दिनांक नेमून देण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा वर नमूद केलेला प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचा आहे.

**सन २०२५ चे वि.स.वि. क्र. १०६ महाराष्ट्र लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक, २०२५**

(महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ यातील उतारे)

(सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ )

१. (१) व (२). *** *** ***

(३) तो, राज्य शासन. शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

२. (१) या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर, व्याख्या (क) ते (उ) व्याख्या.

(च) " सक्षम प्राधिकारी " याचा अर्थ, -

(एक) मुख्यमंत्र्याच्या संबंधात, महाराष्ट्र विधानसभा, असा आहे;

(दोन) खंड (ण) मध्ये निर्दिष्ट केलेल्या मंत्र्यांच्या संबंधात, राज्यपाल, असा आहे ;

(तीन) मंत्री वगळून, महाराष्ट्र राज्य विधानमंडळाच्या सदस्याच्या संबंधात,—

(क) महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सदस्याच्या बाबतीत, विधानपरिषदेचा सभापती ; आणि

(ख) महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्याच्या बाबतीत, विधानसभेचा अध्यक्ष, असा आहे ;

(चार) कलम १२ च्या पोट-कलम (१) च्या खंड (घ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्तींच्या संबंधात, संबंधित प्रशासकीय विभागाचा मंत्री, असा आहे ;

(पाच) अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या ( भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा, भारतीय वन सेवा, इत्यादींसह) संबंधात, मुख्यमंत्री, असा आहे ;

(सहा) राज्य शासनाच्या विभागामधील एखाद्या अधिकाऱ्याच्या संबंधात, असा अधिकारी ज्या विभागाच्या अंतर्गत सेवा करीत असेल त्या विभागाचा प्रभारी मंत्री, असा आहे :

परंतु, जर असा अधिकारी हा, राज्य शासनाने घोषित केलेला विभाग प्रमुख असेल तर, मुख्यमंत्री हा, सक्षम प्राधिकारी असेल;

(सात) संसदेच्या किंवा राज्य विधानमंडळाच्या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या किंवा घटित केलेल्या अथवा राज्य शासनाकडून संपूर्णतः किंवा अंशतः वित्तीय सहाय्य मिळत असलेल्या किंवा त्याचे नियंत्रण असलेल्या कोणत्याही निकायाच्या किंवा मंडळाच्या किंवा महामंडळाच्या किंवा प्राधिकरणाच्या किंवा कंपनीच्या किंवा सोसायटीच्या किंवा स्वायत्त संस्थेच्या (मग तिला कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो) अध्यक्षाच्या किंवा सदस्याच्या संबंधात, अशा निकायाच्या किंवा मंडळाच्या किंवा महामंडळाच्या किंवा प्राधिकरणाच्या किंवा कंपनीच्या किंवा सोसायटीच्या किंवा स्वायत्त संस्थेच्या प्रशासकीय विभागाचा प्रभारी मंत्री, असा आहे :

परंतु, जर असा अध्यक्ष किंवा सदस्य हा, अखिल भारतीय सेवेतील अधिकारी असेल तर, मुख्यमंत्री हा, सक्षम प्राधिकारी असेल;

(आठ) संसदेच्या किंवा राज्य विधानमंडळाच्या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या किंवा घटित केलेल्या अथवा राज्य शासनाकडून संपूर्णतः किंवा अंशतः वित्तीय साहाय्य मिळत असलेल्या किंवा त्याचे नियंत्रण असलेल्या कोणत्याही निकायाच्या किंवा मंडळाच्या किंवा महामंडळाच्या किंवा प्राधिकरणाच्या किंवा कंपनीच्या किंवा सोसायटीच्या किंवा स्वायत्त संस्थेच्या (मग तिला कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो) एखाद्या अधिकाऱ्याच्या संबंधात, अशा निकायाचा किंवा मंडळाचा किंवा महामंडळाचा किंवा प्राधिकरणाचा किंवा कंपनीचा किंवा सोसायटीचा किंवा स्वायत्त संस्थेचा प्रमुख असा आहे ;

(नऊ) वरील उप-खंड (एक) ते (आठ) खाली न मोडणाऱ्या अन्य कोणत्याही प्रकरणामध्ये, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील असा विभाग किंवा प्राधिकरण, असा आहे :

परंतु, जर उप-खंड (सात) किंवा (आठ) मध्ये निर्दिष्ट केलेली कोणतीही व्यक्ती, विधानमंडळाची सदस्य देखील असेल, परंतु मुख्यमंत्री किंवा मंत्रिमंडळाची सदस्य नसेल तर, सक्षम प्राधिकारी हा,- -

(क) जर असा सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषदेचा सदस्य असेल त्या बाबतीत, विधानपरिषदेचा सभापती असेल; आणि

(ख) जर असा सदस्य, महाराष्ट्र विधानसभेचा सदस्य असेल त्या बाबतीत, विधानसभेचा अध्यक्ष असेल :

परंतु आणखी असे की, या खंडाच्या प्रयोजनार्थ, जेव्हा या खंडामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीविरूद्ध, अशा व्यक्तीने भ्रष्टाचार केल्याच्या बाबतीत तक्रार केली असेल तेव्हा, अशा प्रकरणी, भ्रष्टाचाराचा आरोप केलेले कृत्य करण्याच्या वेळी उक्त व्यक्तीसाठी असलेला या अधिनियमामध्ये विनिर्दिष्ट केलेला सक्षम प्राधिकारी, या अधिनियमान्वये कारवाई करण्यासाठी सक्षम प्राधिकारी असेल :

परंतु तसेच, जिच्याविरुद्ध तक्रार केली आहे ती व्यक्ती, अशा तक्रारीसाठी सक्षम प्राधिकारी करणारी व्यक्ती असेल तर, अशा प्रकरणी, राज्यपाल, या अधिनियमान्वये अशा व्यक्तीसाठी सक्षम प्राधिकारी असेल;

(छ) ते (झ) *** *** ***

(ञ) " अन्वेषण " याचा अर्थ, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम २ च्या खंड (ज) अन्वये व्याख्या केलेले अन्वेषण, असा आहे ;

(ट) ते (म) *** *** ***

(२) *** *** ***

**३. ते ११.** *** *** ***

**१२.** (१) या अधिनियमाच्या इतर तरतुदींस अधीन राहून, लोक आयुक्त, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ अन्वये, पुढील व्यक्तींच्या बाबतीत तक्रारीमध्ये केलेल्या भ्रष्टाचाराच्या कोणत्याही आरोपात अंतर्भूत असलेल्या, किंवा त्यातून उद्‌भवणाऱ्या, किंवा त्याच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही प्रकरणाची चौकशी करील किंवा चौकशी करण्याची व्यवस्था करील :- लोक आयुक्ताची अधिकारिता.

(क) जी व्यक्ती, मुख्यमंत्री आहे किंवा मुख्यमंत्री राहिलेली आहे अशी कोणतीही व्यक्ती :

परंतु, मुख्यमंत्र्याविरुद्ध कोणतीही चौकशी सुरू करण्यापूर्वी, महाराष्ट्र विधानसभेची पूर्वपरवानगी घेण्यात येईल. त्याबाबतचा प्रस्ताव, महाराष्ट्र विधानसभेच्या लगतनंतरच्या अधिवेशनात ठेवण्यात येईल :

परंतु आणखी असे की, असा प्रस्ताव, सभागृहाच्या एकूण सदस्यांपैकी दोन तृतीयांश सदस्यांद्वारे संमत करण्यात येईल :

परंतु तसेच, लोक आयुक्त, मुख्यमंत्र्याविरूद्धच्या भ्रष्टाचाराच्या अशा कोणत्याही आरोपात अंतर्भूत असलेल्या किंवा त्यातून उद्‌भवणाऱ्या किंवा त्याच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही प्रकरणाची, जेथवर ते राज्याच्या अंतर्गत सुरक्षेशी किंवा सार्वजनिक सुव्यवस्थेशी संबंधित असेल तेथवर, चौकशी करणार नाही :

परंतु तसेच, अशी कोणतीही चौकशी, गुप्तपणे करण्यात येईल आणि जर लोक आयुक्त, तक्रार खारीज करण्यास पात्र असल्याच्या निष्कर्षाप्रत आला असेल तर, अशा चौकशीचा अभिलेख, प्रसिद्ध करण्यात येणार नाही किंवा कोणालाही उपलब्ध करून देण्यात येणार नाही;

(ख) जी व्यक्ती, मंत्री आहे किंवा मंत्री राहिलेली आहे अशी अन्य कोणतीही व्यक्ती ;

(ग) जी व्यक्ती, राज्य विधानमंडळाची सदस्य आहे किंवा सदस्य राहिलेली आहे अशी कोणतीही व्यक्ती ;

(घ) महानगरपालिकेचा, नगरपरिषदेचा, नगरपंचायतीचा, औद्योगिक नगरीचा, जिल्हा परिषदेचा, पंचायत समितीचा किंवा ग्रामपंचायतीचा कोणताही सदस्य किंवा पालिका सदस्य तसेच महापौर, उप महापौर, अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती, उप सभापती, सरपंच व उप सरपंच आणि उक्त स्थानिक प्राधिकरणांच्या कोणत्याही समितीचा अध्यक्ष ;

(ङ) राज्य शासनाच्या कारभाराशी संबंधित असलेले अखिल भारतीय सेवेतील अधिकारी (भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा, भारतीय वन सेवा, इत्यादी);

(च) जी व्यक्ती, गट 'ड' पदावर आहे किंवा काम करीत होती त्या व्यक्ती वगळून, राज्य शासनाचे सर्व अधिकारी व कर्मचारी आणि भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ याच्या कलम २ च्या खंड (ग) च्या उप-खंड (एक) व (दोन) यांमध्ये व्याख्या केलेले लोकसेवक, जेव्हा ते राज्याच्या कारभाराच्या संबंधात सेवा करीत असतील तेव्हा किंवा ज्यांनी सेवा केली असेल असे अधिकारी व कर्मचारी आणि लोकसेवक ;

(छ) संसदेच्या किंवा राज्य विधानमंडळाच्या अधिनियमाद्वारे किंवा त्यान्वये स्थापन केलेल्या किंवा राज्य शासनाद्वारे संपूर्णतः किंवा अंशतः वित्त पुरवठा करण्यात येत असलेल्या किंवा त्याच्याद्वारे नियंत्रण केले जात असलेल्या कोणत्याही संस्थेचे किंवा मंडळाचे किंवा महामंडळाचे किंवा प्राधिकरणाचे किंवा कंपनीचे किंवा सोसायटीचे किंवा विश्वस्त संस्थेचे किंवा स्वायत्त संस्थेचे (कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असलेल्या), खंड (च) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यांशी व कर्मचाऱ्यांशी समकक्ष असलेले, सर्व अधिकारी व कर्मचारी;

(ज) *** *** ***

**स्पष्टीकरण.—** खंड (छ) व (ज) च्या प्रयोजनार्थ, याद्वारे असे स्पष्ट करण्यात येत की,—

(एक) कोणतीही संस्था किंवा परिसंस्था, मग तिला कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो, महामंडळ, सोसायटी, विश्वस्त संस्था, व्यक्तींचा संघ, भागीदारी संस्था, एकमात्र भागीदारी संस्था, मर्यादित दायित्व असलेली भागीदारी संस्था (मग त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्यान्वये तिची नोंदणी केलेली असो किंवा नसो) या, या खंडांमध्ये समाविष्ट असलेल्या संस्था असतील;

(दोन) एखाद्या सोसायटीस, व्यक्तींच्या संघास, किंवा विश्वस्त संस्थेस, राज्य शासनाकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून जमिनीच्या, सहाय्यक अनुदानाच्या, कर्जाच्या, भाग भांडवलाच्या, शासकीय हमीच्या स्वरूपात किंवा त्यापैकी कोणत्याही स्वरूपात, कोणतेही सहाय्य मिळत असेल तर, अशा सोसायटीस, व्यक्तींच्या संघास किंवा विश्वस्त संस्थेस, राज्य शासनाकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून संपूर्णतः किंवा अंशतः अनुदान मिळत असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, या खंडामध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही व्यक्ती, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ याच्या कलम २ च्या खंड (ग) अन्वये लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल आणि त्या अधिनियमाच्या तरतुदी, त्यानुसार लागू होतील.

(२) *** *** ***

**१३. ते २३.** *** *** ***

**२४.** (१) व (२) *** *** *** अन्वेषण.

(३) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम १७३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य अभिकरण, लोक आयुक्ताने त्याच्याकडे निर्दिष्ट केलेल्या प्रकरणांच्या बाबतीत, लोक आयुक्ताकडे अन्वेषण अहवाल सादर करील.

(४) पोट-कलम (३) खालील अहवाल हा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम १७३ मध्ये निर्दिष्ट केलेले अन्वेषण पूर्ण झाल्यावर दाखल केले अहवाल असल्याचे मानण्यात येईल.

(५) व (१०) *** *** ***

**२५. व २६.** *** *** ***

" **२७.** (१) लोक आयुक्ताने किंवा त्याच्या कर्मचाऱ्यांपैकी कोणत्याही सदस्यांनी, या अधिनियमाअन्वये कोणतीही चौकशी किंवा अन्वेषण करण्याच्या ओघात किंवा त्या प्रयोजनार्थ मिळविलेली कोणतीही माहिती, आणि अशा माहितीच्या संबंधात नोंदविलेला किंवा गोळा केलेला कोणताही पुरावा हा, कलम २४ च्या पोट-कलम (२) च्या तरतुदींस अधीन राहून, गोपनीय असल्याचे समजण्यात येईल आणि भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतेही न्यायालय, अशा माहितीशी संबंधित असणारा पुरावा देण्यासाठी किंवा अशा प्रकारे नोंदविलेला किंवा गोळा केलेला पुरावा सादर करण्यासाठी लोक आयुक्तास किंवा कोणत्याही लोकसेवकास भाग पाडणार नाही. माहितीची गुप्तता.

(२) पोट-कलम (१) मधील कोणतीही गोष्ट,

(क) अन्वेषणाच्या प्रयोजनांसाठी किंवा त्यावर करावयाच्या कोणत्याही अहवालामध्ये किंवा अशा अहवालामध्ये हाती घ्यावयाच्या कोणत्याही कारवाईसाठी किंवा कार्यवाहींसाठी ; किंवा

(ख) शासकीय गुपिते अधिनियम, १९२३ याखालील एखाद्या अपराधासाठी किंवा भारतीय दंड संहितेखालील खोटा पुरावा देण्याच्या किंवा तयार करण्याच्या अपराधासाठी कोणत्याही कार्यवाहीच्या प्रयोजनार्थ किंवा कलम ५१ खालील कोणत्याही कार्यवाहीच्या प्रयोजनार्थ ; किंवा

(ग) विहित करण्यात येईल अशा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ, कोणतीही माहिती किंवा तपशील उघड करण्यासाठी लागू असणार नाही.

**२८. व २९.** *** *** ***

**३०.** (१) *** *** *** लोक सेवकाविरूद्धच्या चौकशीवरील कारवाई.

(२) विशेष न्यायालय, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम १९७ किंवा भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ याच्या कलम १९ यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, लोक आयुक्ताने किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने, अन्वेषण पूर्ण झाल्यावर दोषारोप पत्र दाखल केल्यावर, कोणत्याही लोकसेवकाने केलेल्या अपराधाची दखल घेऊ शकेल.

(३) व (४) *** *** ***

**३१. ते ३४.** *** *** ***

**३५.** (१) *** *** *** विवक्षित प्रकरणी लोक आयुक्तास दिवाणी न्यायालयाचे अधिकार असणे.

(२) लोक आयुक्तासमोरील कोणतीही कार्यवाही ही, भारतीय दंड संहितेच्या कलम १९३ च्या अर्थांतर्गत न्यायिक कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

**३६. ते ४९.** *** *** ***

लोकआयुक्ताचा जाणीवपूर्वक अपमान करणे किंवा त्याच्या कामात अडथळा आणणे किंवा त्याची अपकीर्ती करणे.

**५०.** (१) जो कोणी, लाक आयुक्ताचा अध्यक्ष किंवा सदस्य, या अधिनियमान्वये कोणतीही चौकशी किंवा अन्वेषण करीत असताना, त्यांचा कोणत्याही प्रकारे जाणीवपूर्वक अपमान करील, किंवा त्यांच्या कामात कोणताही अडथळा आणील तो, दोषसिद्ध झाल्यावर, सहा महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाच्या शिक्षेस किंवा द्रव्यदंडास किंवा या दोन्हीही शिक्षांस पात्र असेल.

(२) जो कोणी, उच्चारलेल्या शब्दांद्वारे किंवा शब्द वाचले जावेत या उद्देशाने, ज्यामुळे लोक आयुक्ताचा अध्यक्ष किंवा सदस्य यांची अपकीर्ती होईल असे कोणतेही विधान करील किंवा ते प्रसिद्ध करील अथवा तसे इतर कोणतेही कृत्य करील तो, दोषसिद्ध झाल्यावर, सहा महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाच्या शिक्षेस किंवा द्रव्यदंडास, किंवा या दोन्हीही शिक्षांस पात्र असेल.

(३) लोक आयुक्ताचा अध्यक्ष किंवा सदस्य यांच्या विरुद्धच्या अपराधाच्या बाबतीत, राज्यपालाच्या पूर्वमंजुरीखेरीज, अशा अपराधाच्या बाबतीत सरकारी अभियोक्त्याकडून कोणतीही तक्रार करण्यात येणार नाही या फेरबदलांस अधीन राहून, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम १९९ च्या पोट-कलमे (२) ते (५) च्या तरतुदी, त्या ज्याप्रमाणे उक्त कलम १९९ च्या पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अपराधांच्या संबंधात लागू होतात त्याचप्रमाणे त्या पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) खालील अपराधांच्या संबंधात लागू होतील.

**५१. ते ५५.** *** *** ***

लोक आयुक्ताचे अध्यक्ष, सदस्य, अधिकारी व कर्मचारी लोकसेवक असणे.

**५६.** लोक आयुक्ताचे अध्यक्ष, सदस्य, अधिकारी व अन्य कर्मचारी हे, जेव्हा या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींनुसार काम करीत असतील किंवा काम करण्याचे अभिप्रेत असतील तेव्हा, ते, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार, लोकसेवक असल्याचे मानण्यात येतील.

**५७. ते ६४.** *** *** ***

शंका दूर करणे.

**६५.** शंका निरसनार्थ, याद्वारे जाहीर करण्यात येत आहे की, या अधिनियमामधील कोणत्याही गोष्टीचा,-

(क) भारतीय दंड संहितेच्या कलम १९ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कोणताही न्यायाधीश ;

(ख) ते (छ) *** *** ***

यांनी किंवा त्यांच्या मान्यतेने केलेल्या कोणत्याही कारवाईचे अन्वेषण करण्यासाठी लोक आयुक्तास प्राधिकार असल्याचा अन्वयार्थ लावण्यात येणार नाही.

**६६.** *** *** ***

**अनुसूची.** *** *** ***

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०६.]**

**[महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ यामध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**

मुख्यमंत्री**]**

**जितेंद्र भोळे,**

सचिव-१,

महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.